**कृपया प्रसिद्धीसाठी** **4 नोव्हेंबर 2011**

## पेट्रोल दरवाढीमुळे आर्थिक अराजक माजेल : राम नाईक

**मुंबई, शुक्रवार:** ‘‘वारंवार पेट्रोलची दरवाढ करुन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे सरकार देशात आर्थिक अराजक निर्माण करीत आहे. गेल्याच आठवड्यात प्रसिद्ध झालेला महागाईचा दरही वर्षभरातला सर्वाधिक आहे. त्याचबरोबर एका वर्षात 12 वेळा व्याज दर वाढवून सामान्य जनतेला काँग्रेसने जिणे मुश्किल केले आहे’’, अशी तीव्र शब्दात माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी काल झालेल्या पेट्रोल दरवाढीचा निषेध केला आहे.

‘‘पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह व योजना आयोगाचे उपाध्यक्ष श्री. मोन्टेक सिंह हे अर्थतज्ञ मानले जातात. परंतु त्यांचे ज्ञान ‘पुस्तकी’ च दिसते. अन्यथा एका बाजूला सामान्यांना लागणा-या पेट्रोलचे भाव प्रति लिटर रु. 73.81, तर दुसरीकडे श्रीमंतांसाठी लागणा-या विमानाचे इंधन एटीएफ हे रु 12 ने स्वस्त म्हणजे प्रति लीटर फक्त रु. 61.98ला उपलब्ध झाले नसते.’’ अशी टीकाही यावेळी श्री. राम नाईक यांनी केली.

गरीबी रेषेची नवी व्याख्या करुन शहरात 32 रुपयात आणि ग्रामीण क्षेत्रात 26 रुपयात सामान्य माणसाने आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा असे काँग्रेस सरकारचे म्हणणे आहे. पेट्रोल दरवाढीबरोबरच रिझर्व्ह बँकेने एका वर्षात 12 वेळा व्याज दर वाढवून महागाईचा कडेलोट केला आहे. अशा वेळी सामान्य माणसाने आपले पोट कसे भरायचे? असा संतप्त सवाल विचारुन श्री. राम नाईक म्हणाले, ‘‘या दरवाढीवर तात्काळ दिलासा द्यावा अन्यथा देशभर तीव्र क्षोभ उसळेल.’’

**(कार्यालय सचिव)**